# राशिभविष्य - नोव्हेंबर, २०१२.

दादा दामले (dadadamle@gmail.com )

==============================================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात कौटुंबिक सुखाचे दृष्टीने रवि, शुक्र, शनि व हर्षल हे चार ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असणार आहेत. त्यामुळे या राशीच्या काहींना आर्थिक चिंता तर काहीना कौटुंबिक अनारोग्य, तसेच स्वत:च्या किंवा जीवनसाथीच्या अनारोग्यास सामोरे जावे लागेलसे दिसते. ताप येणे, अपचन होणे, पोटाचे विकार बळावणे, मूत्राशयविकार जडणे अशापैकी एखादा आजार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात कुसंगतीचा त्रास होणे संभवते. तसेच नोकरीत वरिष्ठांचा त्रास होणे संभवते. जपा. महिन्याच्या प्रथम सप्ताहात या राशीच्या काही मंडळीना अति शारीरिक-मानसिक कष्ट सहन करावे लागतीलसे दिसते. त्यामुळे शारीरिक उष्णता भडकून मूळव्याधीसारख्या उष्णता विकारांचा त्रास सहन करावा लागेल. काहींच्या दांपत्यजीवनातील सुखात बाधा येईल. हाती घेतलेल्या कार्यात अडथळे निर्माण होतील. वाममार्ग धन मिळविण्याचा मोह कटाक्षाने टाळा. तसेच शक्यतो प्रवासही टाळाच. कारण मनस्ताप सहावा लागण्याची दाट शक्यता आहे. व्ययस्थानी असलेल्या हर्षलमुळे अकारण शत्रुत्व निर्माण होणे शक्य आहे. या राशीच्या काही मंडळीना तर बेअब्रू होणाऱ्य किंवा जिवावरच्या प्रसंगाला तोंड द्यावे लागेलसे दिसते. जपा. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील. त्यामुळे होणारा मनस्ताप सुसह्य होईल.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल असणार आहे. विशेष करून विद्यार्थी आणि चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र व कलाक्षेत्र असणाऱ्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्ध तर अधिकच अनुकुल होईल. लाभ उठवा. मात्र मित्रांशी भांडणे होण्याचे प्रसंग टाळाच. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना आर्थिक लाभ होतील व हितशत्रूंवर मात करणे शक्य होईलसे दिसते. .मात्र महिन्याच्या उत्तरार्धात उष्णतेच्या विकारांचे प्राबल्य होऊन अनारोग्य होणे संभवते. या राशीच्या काही मंडळीना अपचन, पोटाचे विकार वा मूत्राशयविकाराचा असह्य त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. रवि-मंगळ-राहूमुळे दांपत्यजीवनातील सुखात अनारोग्य, वाद, भांडणे यांमुळे बाधा येणे शक्य आहे. जपा. वीज, पाणी यांपासून अपघात भय आहे. जपा. उद्योग-व्यवसाय करत असणाऱ्या या राशीच्या मंडळीना व्यावसायिक अस्थिर परिस्थितीला तोंड द्यावे लागेल. भागीदारीत उद्योग-व्यवसाय करत असणारांनी भागीदारांत संशयाची परिस्थिती निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी. कोर्टप्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करावा. अशा परिस्थितीत या राशीच्या द्रव पदार्थांचा व्यापार करत असणारांना व मानसिक रोग तज्द्न्यांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. श्रद्धा असेल तर मनापासून केलेली शिवोपासना अनुकुल होईल व त्यामुळे मनाला येणारे नैराश्य व मरगळ नाहीशी होईल.

**(३) मिथुन -** या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळींचा स्वभाव अतिशय चंचल व अस्थिर झाला असण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे मनाची अस्वस्थता त्रस्त करीत असली पाहिजे. तसे असेल तर मन स्थिर, घट्ट व खंबीर होण्यासाठी उत्साहवर्धक उपायांचा अवलंब करावा लागेल. विशेष करून महिन्याच्या पूर्वार्धात अधिक मानसिक अस्वस्थतेचा त्रास होणे संभवते. पण गुरु-शुक्राच्या शुभ योगामुळे मनोनुकुल घटना घडतील व मनस्वास्थ्य लाभेल. अध्यात्मात रस असणारांना आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. सामाजिक कार्यात कार्यरत असणारांना प्रगती करणे शक्य होईल. पण संततीचे आजार,

जवळच्या मंडळींचे दूरत्व निर्माण झाले नाही, तरच कुटुंबात घडणाऱ्या शुभ घटनांचा आनंद व सुखसमाधान अनुभवू शकाल. शेती व्यवसाय असणारांना काळ लाभदायक होईल. संततिसुख व मित्रसुख लाभेल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना, या राशीच्या ज्या मंडळीचा परधर्मीयांशी व्यावसायिक संबंध आहे अशांना तसेच उच्च बौद्धिक शास्त्रीय संशोधन क्षेत्रात कार्यरत असणारांना महिन्याचा उत्तरार्ध प्रगतिकारक व लाभदायक होईल. जीवनसाथीचे अनारोग्य, मतभेद, वाद अशापैकी कारणांनी दांपत्यजीवनातील सुखात बाधा येणे संभवते. काही मंडळीना सूचक स्वप्ने पडतील तर काहीना परदेशगमनाची संधी मिळेल. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल.

**(४) कर्क -** शारीरिक, मानसिक आरोग्याच्या दृष्टीने या राशीच्या मंडळीना या महिन्याचा उत्तरार्ध प्रतिकुल असणार आहे. स्वत:चे व संततीचे अनारोग्य, हाती घेतलेल्या कार्यात होणारी दिरंगाई, खर्च वाढ अशापैकी कारणांनी मन अस्वस्थ होईल व त्यामुळे गहरे नैराश्य येणे संभवते. नोकरीत वरिष्ठांचा त्रास सहन करावा लागेल. अपेक्षित संततिसुख लाभेलच याची खात्री नाही. त्यामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेलच याची खात्री देता येत नाही. अशा परिस्थितीत महिन्याच्या पूर्वार्धातच गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या नवपंचम योगामुळे इच्छाआकांक्षा पूर्ण होतील. अनेक मार्गांनी अर्थलाभ होणेही शक्य आहे. गूढ व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना प्रगतीच्या दृष्टीने व विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस महिन्याचा पूर्वार्ध अनुकुल होईल. विवाहेच्छू युवकयुवतींचे विवाह ठरतील. नवे मित्र मिळतील. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. या राशीच्या काही मंडळीना भूमिलाभ तर काहीना मानाचे स्थान वा पद प्राप्त होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात रक्तदाब, हृदयविकार असणारांनी विशेष जपावे. उष्णताविकारांचा त्रास होणे संभवते. पाण्यापासून धोका संभवतो. गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. काही मंडळीना अपप्रचाराचा त्रास होईलसे दिसते. या राशीचा स्वामी चंद्र हा मनाचाही कारक असल्याने विशेष करून मन:शक्ती वाढविणे जमल्यास खूपच सुखाचे होईल.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने अनुकुल व लाभदायक असल्याचाच अनुभव येईल. पण सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळीना मात्र महिन्याचा पूर्वार्धच अधिक मनोनुकुल घटना घडविणारा असल्याचा अनुभव येईल. महिन्याच्या पूर्वार्धात गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या शुभ योगामुळे या राशीच्या सर्वांनाच विविध मार्गांनी आर्थिक लाभ होणे संभवते .तसेच या राशीच्या चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना, वकिली-सल्लागारी व्यवसाय असणारांना, शिक्षणक्षेत्रात कार्यरत असणाराना, वैद्यकीय व्यवसाय असणारांना, औषधविक्रेत्याना, यांत्रिकतांत्रिक व्यवसाय असणारांना अशा सर्वांना या महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक असल्याचा अनुभव येईल. मात्र महिन्याच्या उत्तरार्धात कौटुंबिक सुखसमाधान व संततिसुखाचे दृष्टीने काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. मुलांचे आजारपण किंवा आचरणविषयक समस्या त्रस्त करतील. कुटुंबात गैरसमजाने वाद, भांडणे, असमाधानकारक घटना घडण्याची शक्यता दिसते. काही मंडळीना राहत्या जागेची समस्या किंवा स्थावरसंबंधी समस्या मनस्ताप देतील. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. दांपत्यजीवनात मतभेद, वाद, गैरसमज अशापैकी कारणांनी सुखसमाधान मिळणे अशक्य होईल. जपा. या राशीच्या सर्वांनी सतत सावधानतेनेच आचरण करावे. अपघातभय संभवते. जपा. सर्वसाधारणपणे या राशीच्या मंडळीचा स्वभाव मानी व अहंकारी असल्याने त्यांनी मनावर संयम ठेवून व सहनशील बनून आचरण केल्यास होणारा मनस्ताप खूपच कमी होईल.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या पूर्वार्धात रवि-शनि हे दोन ग्रह व उत्तरार्धात मंगळ प्रतिकुल असणार आहे. त्यामुळे वाढता खर्च, आर्थिक चिंता, फ़सवणूक अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. तसेच कुटुंबात अनिष्ट घटना घडणे संभवते. काही मंडळीना कोर्ट प्रकरणाचा त्रास सहन करावा लागेल. पण गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने परिस्थिती अटोक्यात राहील व अनुकुल घटना घडून होणारा मनस्ताप सुसह्य होईल. या राशीच्या काही मंडळीना डोळ्याच्या दुखण्याचा त्रास सहन करावा लागेल. महिन्याचा उत्तरार्ध या राशीच्या नोकरदार मंडळीना अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. स्वतंत्र व्यवसाय असणारांना नवा हुरूप येईल. त्यांची महत्त्वाकांक्षा वाढेल. पण महिन्याचा उत्तरार्ध कौटुंबिक सुखाचे दृष्टीने प्रतिकुलच होईल. गैरसमज, वाद, भांडणे, असमाधानकारक घटना, राहत्या जागेबाबतची समस्या किंवा स्थावरसंबंधी समस्या त्रस्त करतील. जपा. शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ असल्याने काल्पनिक चिंतांमुळे सकारण-अकारण मन अस्वस्थ राहील. काही मंडळीना उगीचच कसल्या तरी आजारभावनेने नैराश्य येईल. जीवनसाथीचा स्वभाव लहरी व विक्षिप्त झाल्यास दांपत्यजीवनात मतभेद व भांडणे होतीलसे दिसते. कोर्ट प्रकरणे असतील तर ती प्रयत्न करून पुढे ढकलणेच इष्ट होईल. भागीदारीत उद्योग-व्यवसाय असेल तर संशयाची परिस्थिती निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करण्यास व मन:शांती मिळवण्यास काळ अनुकुल होईल.

**(७) तुळा -** भावनाशील मन व अति विचार यामुळे या राशीच्या मंडळीना शारीरिक-मानसिक आरोग्याच्या दृष्टीने या महिन्याचा काळ प्रतिकुल असणार आहे. त्यामुळे सतत मनाविरुद्ध घडणाऱ्या घटनांचा मुकाबला करण्यासाठी मन शांत व खंबीर ठेवण्याचा आणि अकारण अति विचार न करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ज्यांना रक्तदाब किंवा हृदयविकार आहे त्यांनी तर विशेषच काळजी घेतली पाहिजे. मनस्तापाने थकवा जाणवेल. जपा. आप्तेष्टांशी होणारे वाद, भांडणे टाळा. नपेक्षा शारीरिक उष्णता भडकून डोळे, घसा, मान यांचे आजार होणे संभवते. फ़सवणुकीने आर्थिक नुकसान होणे संभवते. अति विचाराने डोकेदुखी वा मेंदूविकार होणे संभवते. काहींना मुदतीचा ताप येणे तर काहींना त्वचारोग, मुखदंतरोग अशापैकी आजार सहन करावे लागतील. जपा. या राशीच्या ज्या मंडळींची नोकरी कष्ट-परिश्रमाची आहे त्यांना कामाचा असह्य ताण सहन करावा लागेलसे दिसते. अशा परिस्थितीत शुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व मनाला दिलासा मिळेल. तसेच या राशीच्या ज्या मंडळींच्या जन्मकुंडलीत अचानक लाभाचे योग असतील अशापैकी काहींना अचानक धनलाभ किंवा वारसा हक्काने धनलाभ होणे शक्य आहे. शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ आहे ही बाब सतत ध्यानात ठेवूनच सतत नम्रतचे आचरण करणे सुखाचे होईल. श्रद्धा असेल तर शिवोपासना व मारुतीची उपासना केल्यास खूपच दिलासा मिळेल.

**(८) वृश्चिक** - या राशीच्या मंडळींचा मूळ स्वभाव तापट, हेकट, हट्टी, मानापमान फ़ार अशा प्रकारचा असण्याची शक्यता असते. म्हणून सांगावेसे वाटते की सध्याच्या विपरीत काळाशी मुकाबला करण्यासाठी मन व बुद्धी शांत व स्थिर ठेवा व संयम राखून सहनशीलतेचे आचरण करा. असह्य मनस्तापामुळे शारीरिक-मानसिक अनारोग्य संभवते. सर्व आर्थिक व्यवहार सावधानतेने व विचारपूर्वकच करा. फ़सवणूक होणार नाही याची काळजी घ्या. स्वाभाविक दोषामुळे अति श्रम, दगदग होणे संभवते. या राशीच्या सर्वच नोकरदार मंडळीना प्रतिकुल परिस्थितीला सामोरे जावे लागेल. रक्तदाब, हृदयविकार असे आजार असणारांनी मन अगदी शांत ठेवण्याचा कटाक्षाने प्रयत्न करावा. अति विचार करू नये. नव्या उलाढाली करू नका. अनुकुल

काळ येईल तेव्हा जे काही साध्य करावयाचे त्याची पूर्वतयारी करून ठेवण्यास हरकत नाही. सध्याच्या प्रतिकुल काळात गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व मनाला दिलासा मिळेल. या राशीच्या विवाहेच्छू युवकयुवतींचे विवाह ठरतील किंवा संपन्न होतील. या राशीच्या चिकित्सक बौद्धिक व शास्त्रीय संशोधन क्षेत्रात कार्यरत असणारांना , साहित्यिकांना व कलावंतांना प्रगती, यश व अर्थलाभ या दृष्टीने काळ अनुकुल होईल. कौटुंबिक जीवनात विविध कारणांनी अशांत परिस्थिती निर्माण झाल्यास अपेक्षित गृहसौख्य मिळणार नाही. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना मनाला दिलासा देईल.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळीना नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने महिन्याचा पूर्वार्ध अनुकुल व प्रगतिकारक असला तरी प्रथम सप्ताहात मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता आहे. काही जुनी दबलेली प्रकरणे असतील तर त्यांचा पुन्हा त्रास होणे संभवते. महिन्याच्या दुसऱ्या सप्ताहात स्वाभाविक दोषांमुळे अकारण श्रम, दगदग होणे संभवते. त्यामुळे आरोग्यविषयक समस्या निर्माण होणेही शक्य आहे. जपा. महिन्याचा पूर्वार्ध शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना, वकिली-सल्लागारी व्यवसाय असणारांना, तसेच चिकित्सक बौद्धिक व्यवसाय असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे प्रगती साधणे शक्य होईल. महिन्याचा उत्तरार्ध कला क्षेत्रातील मंडळीना अनुकुल होईल. या राशीच्या काही मंडळीना परदेशगमनाचे तर काहीना जलप्रवासाचे योग येतील. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राहील; पण दिनांक ९ पासून मंगळ-हर्षल केंद्र योग होत असल्याने स्वाभाविक दोष व कोणाशी न पटवून घेण्याच्या वृत्तीमुळे मनस्ताप सहन करावा लागेल. त्यामुळे गृहसौख्य मिळणेही कठिण होईल. महिन्याच्या उत्तरार्धात नोकरी-व्यवसायात सतत मनाविरुद्ध घटना घडतील व त्यामुळे मन अस्वस्थ होईल व नैराश्य येईल. जपा. मुलांपैकी कोणाची कसली तरी समस्या त्रस्त करील. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मनाला दिलासा मिळेल.

**(१०) मकर -** या महिन्याचा उत्तरार्धच या राशीच्या शासकीय, निम-शासकीय सेवेत कार्यरत असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. तसेच कोळसा व रासायनिक पदार्थ विक्रेत्यांना सुद्धा महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व लाभदायक होईल. पण महिन्याच्या पूर्वार्धात रवि-शनि युतीमुळे व दिनांक ९ पासून मंगळ ग्रह राशीच्या व्ययस्थानी जात असल्यामुळे मानहानी होण्याची व थोड्या अडचणी, अडथळे येऊन असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. विशेष करून कला-क्षेत्रातील मंडळीना अधिक त्रास होईलसे दिसते. या राशीच्या काही मंडळीना आर्थिक चिंता त्रस्त करील. काहींना नव्या आर्थिक जबाबदाऱ्या पूर्ण करण्याबाबतची चिंता सतावेल. वाम-मार्ग धन मिळवणे ज्यांना सहज शक्य आहे अशा मंडळींनी तो मोह टाळावाच असे आग्रहाने सांगावेसे वाटते. पण गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या शुभ योगामुळे महिन्याच्या पूर्वार्धात मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व मनाला थोडा दिलासा मिळेल. उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन क्षेत्रात कार्यरत असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व घेतलेल्या परिश्रमांचे सार्थक झाल्याचे समाधान देणारा असाच सिद्ध होईल. या राशीच्या काही मंडळीना परदेशगमनाचे योग येतील. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. पण या राशीच्या मंडळीना संततिविषयक एखादी समस्या त्रस्त करीलसे वाटते. कुलदैवताची उपासना अनुकुल होईल.

**(११) कुंभ -** या राशीच्या मंडळींचे मन सध्या अतिशय कोमल झाले असावे, असे वाटते. त्यामुळे मानसिक संवेदनाही शीघ्र होत असतील. असे असेल तर थोडे काहीही मनाविरुद्ध घडले तर लगेच गहरे नैराश्य येत

असावे. अशा परिस्थितीत स्वभाव अतिशय लहरी, चंचल, अस्थिर बनत असल्याने हातून अविचाराने खर्च होणे, कोणालाही टाकून बोलणे, विचित्र आचरण करणे अशा गोष्टी घडू शकतात. जपा. अशा परिस्थितीत कौटुंबिक सुखसमाधान मिळत असले तरी नातेवाईक मंडळीशी न पटल्याने मनस्ताप होणे संभवते. महिन्याच्या प्रथम सप्ताहात शक्यतो प्रवास टाळा. प्रवासात मनस्ताप व मानहानी होण्याची शक्यता दिसते. दिनांक ९ नंतर मंगळ या राशीच्या लाभस्थानी गेल्यावर काही मंडळीना मौल्यवान वस्तू मिळण्याची शक्यता दिसते. पण सामान्य नोकरदार मंडळीना मात्र कष्ट, परिश्रम करूनच खर्चाची तोंडमिळवणी करावी लागेल. महिन्याच्या उत्तरार्धात शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना काळ प्रगतिकारक व लाभदायक असल्याचा अनुभव येईल. काही मंडळीना अधिकार पद तर काहींना प्रतिष्ठा प्राप्त होणारे स्थान मिळेल. मात्र मित्र मंडळीशी वितुष्ट येणार नाही याची काळजी घ्या. स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात मात्र अडचणी, अडथळे निर्माण होणे संभवते. जपा. महिन्याच्या पूर्वार्धात गुरु-शुक्र शुभ योगामुळे या राशीच्या मंडळीना कमी-अधिक प्रमाणात विविध प्रकारचे लाभ होतील, असे वाटते.

**(१२) मीन -** सध्या या राशीच्या मंडळीचा स्वभाव अतिशय चंचल, अस्थिर व लहरी असा झाला असण्याशी शक्यता जाणवते. धाक, दडपण सहन होत नसावे. या राशीच्या लहान मुलांकडे पालकांनी विशेष लक्ष देणे जरूरीचे होईल. पण गुरु-हर्षल योगामुळे या राशीच्या शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना काळ प्रगतिकारक व यशदायक असल्याचा अनुभव येईल. मात्र त्यांनी मन सतत उत्साही राहील याची काळजी घेतली पाहिजे. या राशीच्या व्ययस्थानी असलेला नेपच्यून गुप्त पोलीस खात्यात काम करत असणारांना उपयुक्त होईल. प्रवासाचे योग येतील, या राशीच्या साहित्यिकांचे ग्रंथलेखन प्रसिद्ध होईल. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. रवि-शनि प्रतिकुल असल्याने असह्य मनस्तापामुळे शारीरिक अनारोग्य होणे शक्य आहे. जपा. वाद, भांडणे यांमुळे कौटुंबिक सुख व गृहसौख्य मिळेलच याची खात्री देता येत नाही. जपा. घरी वडील मंडळीशी पटणार नाही, तर नोकरीत वरिष्ठांशी मतभेद, वाद होणे संभवते. नोकरी कोणत्याही प्रकारची असो, कामाचा ताण सहन करावा लागेल. स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात अडचणी, अडथळे निर्माण होतील. महिन्याच्या पूर्वार्धात काही मंडळीना कुसंगतीमुळे आर्थिक नुकसान सहन करावे लागण्याची शक्यता दिसते. जपा. एकंदरीत पाहता या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ फ़ारसा अनुकुल नाही असेच म्हणावे लागेल. अशा परिस्थितीत मनस्वास्थ्यासाठी श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासनाच मनाला दिलासा देईल.

==========00000===========